# प्रकल्प वेळेत सुरू व्हावा

मेट्रो ३ हा प्रकल्प पश्चिम उपनगरांतील मुंबईकरांच्या जलद प्रवासासाठी मोलाची भूमिका बजावणार आहे. नदीखालून भुयारी मार्ग तयार करण्याचे आव्हानात्मक काम हा प्रकल्प उभा करणाऱ्या मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने पूर्ण केले आहे. वेगवेगळ्या कारणांमुळे आधीच या मार्गिकेला विलंब झाला आहे. त्याला आणखी उशीर होऊ नये. प्रामुख्याने चाकरमान्यांच्या कार्यालयाचे ठिकाण असलेला प्रकल्पातील किमान पहिला टप्पा लवकर सुरू करा, अशी मागणी जोर धरत आहे. त्यामुळे या मार्गिकेचा पहिला टप्पा याच वर्षी डिसेंबरपर्यंत पूर्ण व्हावा, अशी सर्वसामान्य मुंबईकरांची अपेक्षा आहे.